# ऋणनिर्देश

वाचकांची वाचनविषयक आस्था आणि आवड सातत्याने टिकवून धरणारा कादंबरी हा लोकप्रिय वाङ;मय प्रकार आहे. माझ्या आजवरच्या अभ्यासातून व वाचनातून ग्रामीण कादंबरीकडे बघण्याचा माझा एक विशिष्ट असा दृष्टीकोन तयार झाला. ग्रामीण कादंबरीचे आशयविश्‍व व्यापक आणि सार्वत्रिक असले तरी विशिष्ट अशा प्रादेशिकतेमुळे अशा कादंबऱ्यात मुलभूत स्तरभेद निर्माण झालेले आहेत. असे लक्षात आल्यानंतर तर माझा हा दृष्टीकोन अधिक डोळस बनला.

मी याच भूमिकेतून प्रदेशातील ग्रामीण कादंबऱ्यांचे परीक्षण केल्यानंतर तर माझ्या या दृष्टीकोनाला अधिक बळकटी येत गेली. ग्रामीण जीवन सार्वत्रिक असले तरी विशिष्ट असा भौगोलिक परिसराने त्याला स्वत:चे स्वतंत्र असे रूप दिलेले असते. त्यामुळे त्यात स्तरभेद निर्माण झालेले असतात आणि ते स्वत:तेथील प्रादेशिक वैशिष्टयांशी एकरूप असतात. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये ग्रामजीवनाची सार्वत्रिकता सतत असली तरी ती केवळ वरवरची असते. त्यात भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे स्तरभेद पडलेले असतात. हे स्तरभेद भाषा, लोक जीवन, रूढी, परंपरा, धारणा, जाणिवा, व्यवसाय असे विविधांगी असतात. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये त्यांचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले ठळकपणे दिसून येते. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये साम्य- भेद कोणते याचा अधिक बारकाईने व सखोलपणे शोध घेता यावा या उद्देशाने ''मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' हा संशोधन विषय येथे मी निश्चित केला आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या सिध्देतेसाठी माझे मार्गदर्शक डॉ. चं. वि. जोशी यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चेमुळे माझा आत्मविश्‍वास वाढला. मी केलेले लेखन त्यांनी न कंटाळता तपासले. या विषयी मौलिक सुचना केल्या तसेच या विषयावर स्वतंत्र विवेचन करण्यात परवानगी दिली.

UNIVERSITY OF
JAYAKAR LIBRARY
PUNE

माझ्या लेखनाची वेळोवेळी फेरतपासणी केली. म्हणूनच माझे संशोधन पुर्णत्वास आले. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुहासिनी जोशी मॅडम यांनी माझ्या चार वर्षाच्या अभ्यासकाळात सौजन्याचा, प्रसन्नतेचा पारिजात अखंड तेवत ठेवला. या अभ्यासाच्या निमित्ताने माझे त्यांच्याशी स्नेहबंधाचे नाते निर्माण झाले. या परिवाराशी जुळून आलेले ऋणानुबंध माझ्या आयुष्याला लाख मोलाचा ठेवा आहे.

हा संशोधन अभ्यास करीत असताना मला अनेक मान्यावर अभ्यासक हितचिंतक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग हा खरे तर आम्हा संशोधक विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणा स्त्रोतच असतो. या विभागातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. अशोक शिंदे (अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ,पुणे विद्यापीठ ) प्रा. डॉ. मनोहर जाधव, प्रा.डॉ. सौ. विद्यागौरी टिळक, मराठी विभागातील कार्यालयीन सेवक व पीएच.डी. आस्थापना विभागातील कार्यतत्पर सेवक या सर्वांचे प्रेमळ सहकार्य मला सदोदित लाभले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे शिक्षण प्रेमी अध्यक्ष आणि विद्यमान खासदार मा. श्री. बाळासाहेब विखे पाटील (माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार) मा. आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील (माजी मंत्री, महाराष्ट्र शासन) व मा. आमदार श्री. अण्णासाहेब म्हस्के पाटील (माजी मंत्री, महाराष्ट्र सरकार) मा. सौ. शालिनीताई विखे पाटील (अध्यक्षा, जिल्हा परिषद, अहमदनगर ), श्री. राजेंद्र पाटील विखे (सिनेट सदस्य, पुणे विद्यापीठ), श्री. आबासाहेब घोलप (संचालक, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था) यांचे आशीर्वाद सतत मस्तकावर होते. आपल्या शिक्षण संस्थेतील सेवकांच्या गुणवत्तावाढीच्या प्रयत्नांना नेहमीच मोकळेपणाने उत्तेजन नि मदतीचा हात पुढे करणाऱ्या या सहृद्यांच्या प्रेरणा माझ्या अभ्यासाच्या मुळाशी असल्यामुळेच मी माझा अभ्यास पूर्ण करू शकले.

पद्मश्री विखे पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर. वाळुंज,उपप्राचार्य एन. डी. बोधाई यांनी माझ्या संशोधन कार्यास नेहमीच प्रोत्साहन दिले.

माझे सहकारी व सृजनशील साहित्यीक प्रा. डॉ. आर. एल. वडमारे, महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा.डॉ. जयसिंग भोर, प्रा.डॉ. हरिभाऊ आहेर, प्रा. डाळींबे एस. एन, प्रा. डॉ. रसाळ आर. जी., प्रा. खांडगौरे सी.पी. , प्रा. कोते डी. ए. , प्रा. दिपक माने (फिजिकल विभाग प्रमुख-पुणे विद्यापीठ)या सर्वांनीच माझ्या अभ्यासाचा उत्साह सतत जागृत ठेवला.

शिक्षण क्षेत्रातील ही शेवटची पदवी घेताना पति राजेश यांची इच्छा मी पूर्ण करू शकले यांचे समाधन वाटत आहे. माझी सासू सौ. विमल, सासरे श्री. लक्ष्मण, दीर श्री. मुकुंद, बहिण सौ. रेखा, भाऊ श्री. दीपक तसेच भावजय सौ. संगीता व माझी मुले साई, ओम व मुलगी कु. श्रध्दा या माझ्या कुटूंबातील व्यक्तींचे आशीर्वाद, सहकार्य या अभ्यासासाठी नेहमीच प्रेरणायुक्त ठरले. त्यांचे आभार मानणे उचित नसले तरी त्यांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजते.

या सर्व सहृद्यांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि त्यांच्या आशीवार्दातून या प्रबंधाची सिध्दता झाली आहे. श्री. अशोक कानडे यांनी अत्यंत सुवाच्छ व सुबक अक्षरात या प्रबंधाची छपाई पूर्ण केली. परिश्रमाबरोबरच त्यांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे. जे न्यून आहे ते सर्वस्वी माझे आहे. आणि जे चांगले आहे ते सर्व या व्यक्तींचेच ऋण आहे. आणि म्हणूनच या सर्व हितचिंतक, मार्गदर्शक आणि सहृदयांचे मी आभार मानणे माझे कर्तव्य समजते.

अभ्यासक

**कु. घोलप सुवर्णा भास्कर**

मराठी विभाग

पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर

ता. राहाता, जि. अहमदनगर